राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३१५९ / २०२४ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| देशमुख मोईन अब्दुल लतीफ | उपअधीक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, पुणे | अधीक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, पुणे |

( सुनावणी दिनांक - ३१ / १० /२०२५ )

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये दि.०८.०५.२०२३ रोजी दाखल केलेले सदर द्वितीय अपील राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांचेकडून दि.२७.०५.२०२४ रोजी पुणे खंडपीठास हस्तांतरणाने प्राप्त झाले. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| १०.०२.२०२३ | आपल्या कार्यालयात कार्यरत असलेल्या अधीक्षक अभियंता यांचे मासिक दैनंदिनी चे साक्षांकित प्रती. |

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०१.०३.२०२३ रोजीच्या पत्राने उत्तर देऊन मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने नाकारली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०३.०४.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी यांचा माहिती उपलब्ध करून न देण्याबाबतचा घेतलेला निर्णय कायम ठेवून सदर अपील निकाली काढले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती वैयक्तिक

स्वरुपाची आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. प्रस्तुत प्रकरणात नियमाप्रमाणे कार्यवाही झाली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३१५९ / २०२४ / पुणे 10188/2025 दिनांक - 20/11/25